# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 19/10/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 25 कि.मी. अंतरावरील मौजा पाचगाव कुही फाटा येथे दिनांक 18/10/2021 चे 05.45 वा. दरम्यान कुही पोलीस पथक हे पो.स्टे. परिसरात वाहतुक केसेस करीत असतांना घटनास्थळी एम. एच.–36/ एए–2304 क्रमांकाच्या टाटा झेनान गाडीला थांबवुन तपासले असता सदर वाहनात आरोपी नामे– साहिल पुरूषोत्तम दहीवले, वय 20 वर्ष, रा. निष्ठी ता. पवनी जि. भंडारा हा 11(गाई) कि. 45,000/–रू. चे जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण किंमती 8,45,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई श्री. हिवराज लांजेवार, पो.स्टे. कुही यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(ड) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 83/177, 31/181, 5/180 मोवाका काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अरूण कावळे 9923196154 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन कुहीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री चंद्रकान्त मदने यांचे नेतृत्वात पोलीस हवालदार अरूण कावळे व पोलीस शिपाई श्री. हिवराज लांजेवार यांनी यशस्वीरित्या पार पाडली.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर